अन्नद्रव्य व्यवस्थापन आराखडा

2 वर्षापर्यंतच्या बहार न धरलेल्या झाडांसाठी अन्नद्रव्य व्यवस्थापन	
वर्ष	**अन्नद्रव्य व्यवस्थापन पद्धती**
पहिले वर्ष	• रोपवाटिकेतून रोपे आनल्यानंतर जैविक-फॉर्म्युलेशन जसे की ॲझोस्पिरिलम स्पेसिज, अस्परजिलस नायजर, ट्रायकोडर्मा व्हिरडी आणि पेनिसिलियम पिनोफीलम हे प्रत्येकी 10 ते 20 ग्रॅम प्रती रोप याप्रमाणे मिसळून मोठ्या पिशव्यांमध्ये रोपे स्थलांतरित करावीत. जैविक-फॉर्म्युलेशन हे पुर्ण कुजलेल्या शेणखताबरोबर 1:20 याप्रमाणात बाग लागवडीच्या 15 दिवस आधी सावलीत 60% ओलावा ठेऊन एक दिवसाआड उलथापालथ करून चांगले मिसळून घ्यावे.
	• आर्बस्क्युलर मायकोरायझा बुरशी, एएमएफ (ग्लोमस स्पेसीज) 10 ते 15 ग्रॅम/रोप याप्रमाणे द्यावी.
	• बाग लागवडीच्या अगोदर जैविक-फॉर्म्युलेशन टाकलेली रोपे बुरशीच्या वाढीसाठी कमीत कमी 3 ते 4 महिने रोपवाटिकेत ठेवावीत.
	• शेतात रोपे लागवड करतांना चांगले कुजलेले शेणखत 5 ते 7.5 किलो किंवा कुजलेले कोंबडीखत 2.5 ते 3.5 किलो आणि निंबोळी पेंड 500 ते 750 ग्रॅम/खड्डा/झाड याप्रमाणात द्यावेत.
	• खतांची दुसरी मात्रा पावसाळ्याच्या अगोदर पुढीलप्रमाणे द्यावी. चांगले कुजलेले शेणखत 5 ते 7.5 किलो किंवा कोंबडीखत 2.5 ते 3.5 किलो आणि निंबोळी पेंड 500 ते 750 ग्रॅम/झाड याप्रमाणात द्यावेत. (मोठ्या पिशव्यांमध्ये रोपे स्थलांतरित केल्यानंतर 8 ते 10 महिन्यांनी)
दुसरे वर्ष	• जैविक-फॉर्म्युलेशन जसे की ॲझोस्पिरिलम स्पेसिज, अस्परजिलस नायजर, ट्रायकोडर्मा व्हिरडी आणि पेनिसिलियम पिनोफीलम 10 ते 20 ग्रॅम/झाड हे प्रत्येकी पुर्ण कुजलेल्या शेणखताबरोबर 1:20 याप्रमाणे 15 दिवस सावलीत 60% ओलावा ठेऊन एक दिवसाआड उलथापालथ करून चांगले मिसळून घ्यावे.
	• आर्बस्क्युलर मायकोरायझा बुरशी, एएमएफ (ग्लोमस स्पेसीज) 10 ते 15 ग्रॅम/झाड याप्रमाणे द्यावी.
	• चांगले कुजलेले शेणखत 20 ते 25 किलो किंवा कुजलेले कोंबडीखत 10 ते 15 किलो आणि निंबोळी पेंड 2.0 ते 2.5 किलो/झाड दोन वेळा (मार्च आणि ऑक्टोबर मध्ये) विभागून द्यावीत. कमी तापमानाच्या कालावधीत देणे टाळावे.
	• 300 पीपीएम सॅलिसिलिक ॲसिडच्या 2 ते 3 फवारण्या 1 ते 2 महिन्याच्या अंतराने घ्याव्यात.
	• बहार घेण्याच्या 6 ते 7 महीने अगोदर पाने परीक्षण करून रासायनिक खतांच्या मात्रा द्याव्यात व त्यानंतर बहार घ्यावा.

करावयाची कामे			
अनु. क्रं.	**पानगळ केल्या नंतरचा कालावधी (दिवस)**	**बागेची आवस्था**	**करावयाची कामे**
1.	0	पानगळ	• पानगळीसाठी इथ्रेल 1.5 ते 2.0 मिली/ली + डी.ए.पी. 5ग्रॅम/ली ने फवारणी करावी. • बाग तणमुक्त ठेऊन झाडांचे फुटवे काढावेत.
2.	0 ते 7	ताण तोडणे	• शेणखत 25 ते 30 किलो किंवा शेणखत 15 ते 20 किलो + गांढूळखत 2 किलो + निंबोळी पेंड 2 किलो/झाड. किंवा • कुजलेले कोंबडीखत 7.5 किलो + निंबोळी पेंड 2 किलो/झाड. • जिप्सम 2.5 ते 2.8 किलो आणि मॅग्नेशियम सल्फेट 800 ग्रॅम/झाड मुळांच्या कक्षेत मिसळून द्यावे. • जैविक-फॉर्म्युलेशन जसे की ॲझोस्पिरिलम स्पेसिज, अस्परजिलस नायजर, ट्रायकोडर्मा व्हिरडी आणि पेनिसिलियम पिनोफीलम 10 ते 20 ग्रॅम/झाड हे प्रत्येकी पुर्ण कुजलेल्या शेणखताबरोबर 1:20 याप्रमाणात 15 दिवस सावलीत 60% ओलावा ठेऊन एक दिवसाआड उलथापालथ करून चांगले मिसळून घ्यावे. • आर्बस्क्युलर मायकोरायझा बुरशी, एएमएफ (ग्लोमस स्पेसीज) 10 ते 15 ग्रॅम/झाड याप्रमाणे द्यावी. • जैविक-फॉर्म्युलेशन टाकल्यानंतर लगेचच हलके पाणी द्यावे.
3.	8 ते 14	85 ते 100% पानगळ	
4.	15 ते 21	नवीन पालवी फुटतांना	
5.	22 ते 28	फुलधारणेस सुरुवात	• प्लॅनोफिक्स 22.5 मिलि + स्टिकर 50 मिलि प्रति 100 लीटर याप्रमाणे फवारणी करावी. • सुक्ष्मअन्नद्रव्ये 1 ते 1.5 किलो प्रति हेक्टर याप्रमाणे फवारणी करावी.
6.	29 ते 49	100% फुलधारणा	
7.	50 ते 63	फळधारणेस सुरुवात	• बाग तणमुक्त ठेवावी.

8	64 ते 70	फळधारणा आवस्था	• जैविक-फॉर्म्युलेशन जसे की ॲझोस्पिरिलम स्पेसिज, अस्परजिलस नायजर, ट्रायकोडर्मा व्हिरडी आणि पेनिसिलियम पिनोफीलम 10 ते 20 ग्रॅम/झाड हे प्रत्येकी पुर्ण कुजलेल्या शेणखताबरोबर 1:20 या प्रमाणात 15 दिवस सावलीत 60% ओलावा ठेऊन एक दिवसाआड उलथापालथ करून चांगले मिसळून घ्यावे. • रासायनिक खतांच्या मात्रा देतांना जैविक-फॉर्म्युलेशनच्या 15 ते 20 दिवस अगोदर किंवा नंतर द्याव्यात. • आर्बस्क्युलर मायकोरायझा बुरशी, एएमएफ (ग्लोमस स्पेसीज) 10 ते 15 ग्रॅम/झाड याप्रमाणे द्यावी. • विद्राव्य खत व्यवस्थापण ठिबक सिंचनद्वारे करावे. नत्र:स्फुरद:पालाश 0:52:34 (मोनो-पोटॅशियम फॉस्फेट) 8.50 किलो/हेक्टर याप्रमाणे 7 दिवसाच्या अंतराने 3 वेळा द्यावे. • जिप्सम 1.70 ते 1.80 किलो/झाड आणि मॅग्नेशियम सल्फेट 700 ग्रॅम/झाड मुळांच्या कक्षेत मिसळून पाणी द्यावे. किंवा मॅग्नेशियम सल्फेट ठिबक सिंचनद्वारे दिले तरी चालेल. • नियमित पाणी व्यवस्थापन करावे.
9.	71 ते 126	100% फळधारणा आणि फळवाढीची आवस्था	• विद्राव्य खत व्यवस्थापण ठिबक सिंचनद्वारे करावे. नत्र:स्फुरद:पालाश 0:52:34 (मोनो-पोटॅशियम फॉस्फेट) 8.50 किलो, युरिया 22.50 किलो, 0:0:50 (सल्फेट ऑफ पोटॅश) 16.30 किलो/हेक्टर याप्रमाणे 7 दिवसाच्या अंतराने 5 वेळा द्यावे. • सुक्ष्मअन्नद्रव्ये 1 ते 1.5 किलो/हेक्टर याप्रमाणे फवारणी करावी. • जिब्रेलिक ॲसिड 50 पीपीएम 15 दिवसाच्या अंतराने 2 वेळा फवारणी करावी.
10	127 ते 140	फळवाढ आणि दाण्याला रंग येण्याची आवस्था	• नत्र:स्फुरद:पालाश 0:52:34 (मोनो-पोटॅशियम फॉस्फेट) 10 ग्रॅम/ली याप्रमाणे 10 दिवसाच्या अंतराने 3 वेळा फवारणी करावी. • मँगनीज सल्फेट 6 ग्रॅम/ली 10 दिवसाच्या अंतराने 2 वेळा फवारणी करावी.
11.	141 ते 184	फळवाढीची आवस्था आणि फळांचा विकास	• विद्राव्य खत व्यवस्थापण ठिबक सिंचनद्वारे करावे. नत्र:स्फुरद:पालाश 0:52:34 (मोनो-पोटॅशियम फॉस्फेट)

12.	185 ते 199	फळ परिपक्वता आवस्था	12.80 किलो, युरिया 31.40 किलो, 0:0:50 (सल्फेट ऑफ पोटॅश) 11.50 किलो/हेक्टर याप्रमाणे 7 दिवसाच्या अंतराने 10 वेळा द्यावे.
13.	200 ते 214	फळ परिपक्वतेची 1 महिना तोडणीपुर्वीची आवस्था	
14.	215 ते 230	फळ पक्वतेची आवस्था	
बाग विश्रांतीच्या काळात करावयाची कामे			
		विश्रांती काळात (फळे तोडणीनंतर लगेच द्यावयाची खते)	• कुजलेले शेणखत 20 ते 25 किलो किंवा शेणखत 13 ते 15 किलो + गांढूळखत 2 किलो + निंबोळी पेंड 2 किलो/झाड. किंवा • चांगले कुजलेले कोंबडीखत 7.5 किलो + निंबोळी पेंड 2 किलो/झाड याप्रमाणे द्यावेत. • रासायनिक खते पुढील प्रमाणे द्यावीत. **नत्र:** 205 ग्रॅम (446 ग्रॅम निम कोटेड युरिया/झाड), **स्फुरद: 50** ग्रॅम (315 ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट/झाड) आणि **पालाश: 152** ग्रॅम (254 ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश किंवा 304 ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश/झाड.) देऊन नंतर हलके पाणी द्यावे.